क्र.२/नसवि/प्रशासक/१०/२०२४-२०२५
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- १९ सप्टेंबर २०२४

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रशासक सभा क्रमांक - १०/२०२४-२०२५

स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **शुक्रवार दि.२०/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

४६ ते ५३

५४ १. मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०९/०९/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

५५ २. मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.२६/०६/२०२४ ते दि.०२/०७/२०२४,दि.०३/०७/२०२४ ते १०/०७/२०२४, दि.११/०७/२०२४ ते दि.१८/०७/२०२४, दि.१९/०७/२०२४ ते दि.२८/०७/२०२४ आणि दि.२९/०७/२०२४ ते दि.०५/०८/२०२४ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेणे.

५८ ३. SKOCH या राष्ट्रीय स्पर्धेत मध्यवर्ती निदान केंद्राच्या आरोग्य सुविधांचा माहिती देणारा माहितीपट तयार करणेची कामगिरी मुदतीत व तातडीने करणेची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(२) चे परंतुकान्वये मक्तेदार भोसले ब्रदर्स व घोंगडे फोटो स्टुडिओ ॲण्ड व्हिडिओ यांचेकडून करुन घेणेत आली असून, त्याकामी आलेल्या र.रु.१३५००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेकामी **उपायुक्त (मध्यवर्ती निदान केंद्र) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

५७ ४. महापालिका क्षेत्रामध्ये माझी वसुंधरा अंतर्गत २.० व ३.० प्राप्त झालेल्या बक्षीस रकमेमधून हरित क्षेत्र बनविण्याकरीता रोपे पुरवठा, लागवड व देखरेख करणेकामी एजन्सी नियुक्ती करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर ई-महा-निविदा मागवविणेस व त्याकामी येणारे र.रु.५,३५,३८,०४०/- मात्रचे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त मुख्यालय (बांधकाम (उद्याने) विभाग) यांचे दि.२०/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५ दिनांक :- २०/०९/२०२४ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची स्थायी समिती प्रशासक सभा क्र.१० दि.२०/०९/२०२४ रोजी महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह,सांगली येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक स्थायी समिती सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ.क्र.	उपस्थितांची नावे	अ.क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.शुभम गुप्ता – प्रशासक	१४.	श्री.चिदानंद कुरणे – जलवि / पा.पु., सां./मि.
२.	श्री.रविकांत आडसुळ – अतिरिक्त आयुक्त	१५.	श्री.सहदेव कावडे– सहा.आयुक्त १/ नगरसचिव
३.	श्री.वैभव साबळे – उपायुक्त मालमत्ता व्यवस्थापन	१६.	श्रीमती प्रज्ञा त्रिभुवन – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.२
४.	श्री.संजय ओहोळ - उपायुक्त,मिरज	१७.	श्री.सचिन सागावकर - सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३
५.	श्री.शिल्पा दरेकर - उपायुक्त कर व इतर	१८.	श्री.अनिस मुल्ला- सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४
६.	श्री.विजया यादव – उपायुक्त मालमत्ता व्यवस्थापन	१९.	श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियता
७.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता	२०.	श्री.शंकर भांडारी - ग्रंथपाल
८.	श्री.शिरिष धनवे – मुख्यलेखापरिक्षक	२१.	श्री.धनंजय हर्षद – जनसंपर्क अधि./मालमत्ता अधिक्षक
९.	श्री.अभिजीत मेंघडे - मुख्य लेखाधिकारी	२२.	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेंजर
१०.	श्री.वैभव पाटील – वैद्य.आरोग्य अधि. वैद्य.सेवा	२३.	श्री.सुनिल माळी – मुख्य अग्निशमन अधिकारी
११.	श्री.वैभव वाघमारे - नगररचनाकार मिरज	२४.	श्री.राजेंद्र काकडे – नगररचनाकार, सांगली
१२.	श्री.अशोक माणकापुरे – प्रशासकीय अधिकारी	२५.	श्री.समिर जमादार – विधी विभाग अधिकारी
१३.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी (आस्थापना)		

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१	मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०९/०९/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र. ०२	मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.२६/०६/२०२४ ते दि.०२/०७/२०२४,दि.०३/०७/२०२४ ते १०/०७/२०२४, दि.११/०७/२०२४ ते दि.१८/०७/२०२४, दि.१९/०७/२०२४ ते दि.२८/०७/२०२४ आणि दि.२९/०७/२०२४ ते दि.०५/०८/२०२४ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेणे.
प्रशासक	विषय मंजुर.
विषय क्र.०३	SKOCH या राष्ट्रीय स्पर्धेत मध्यवर्ती निदान केंद्राच्या आरोग्य सुविधांचा माहिती देणारा माहितीपट तयार करणेची कामगिरी मुदतीत व तातडीने करणेची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(२) चे परंतुकान्वये मक्तेदार भोसले ब्रदर्स व घोंगडे फोटो स्टुडिओ अँण्ड व्हिडिओ यांचेकडून करुन घेणेत आली असून, त्याकामी आलेल्या र.रु.१३५००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र.०४	महापालिका क्षेत्रामध्ये माझी वसुंधरा अंतर्गत २.० व ३.० प्राप्त झालेल्या बक्षीस रकमेमधून हरित क्षेत्र बनविण्याकरीता रोपे पुरवठा, लागवड व देखरेख करणेकामी एजन्सी नियुक्ती करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर ई-महा-निविदा मागवविणेस व त्याकामी येणारे र.रु.५,३५,३८,०४०/- मात्रचे खर्चास मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजुर

येणेप्रमाणे सभेचे कामकाज सर्व उपस्थित अधिकारी यांच्या सहमतीने पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- २०/०९/२०२४

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५४ **दिनांक :- २०/०९/२०२४**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०९/०९/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.४८ ते ठराव क्र.५३ हे वाचून दाखविण्यात आले. सदर कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती लिपिक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५५ **दिनांक :- २०/०९/२०२४**

विषय क्रमांक :- ०२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.२६/०६/२०२४ ते दि.०२/०७/२०२४,दि.०३/०७/२०२४ ते १०/०७/२०२४, दि.११/०७/२०२४ ते दि.१८/०७/२०२४, दि.१९/०७/२०२४ ते दि.२८/०७/२०२४ आणि दि.२९/०७/२०२४ ते दि.०५/०८/२०२४ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेवून ही सभा परत पाठवित आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५६ **दिनांक :- २०/०९/२०२४**

विषय क्रमांक :- ०३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मध्यवर्ती निदान केंद्र) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

SKOCH या राष्ट्रीय स्पर्धेत मध्यवर्ती निदान केंद्राच्या आरोग्य सुविधांचा माहिती देणारा माहितीपट तयार करणेची कामगिरी मुदतीत व तातडीने करणेची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(२) चे परंतुकान्वये मक्तेदार भोसले ब्रदर्स व घोंगडे फोटो स्टुडिओ अॅण्ड व्हिडिओ यांचेकडून करुन घेणेत आली असून, त्याकामी आलेल्या र.रु.१३,५००/- मात्रचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा कार्योत्तर मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अतिरिक्त. मध्यवर्ती निदान केंद्र.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- १०/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५७ **दिनांक :-** २०/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (बांधकाम (उद्याने) विभाग) यांचे दि.२०/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस मा.शासना मार्फत राबविण्यात येत असलेल्या माझी वसुधंरा अभियान २.० व ३.० या उपक्रमामध्ये महानगरपालिकेस बक्षीस रक्कम प्राप्त झालेली आहे. सदर बक्षीस रकमेतून महानगरपालिका क्षेत्रात करावयाच्या कामगिरीबाबतच्या अहवालास मा.शासन निर्णय क्र. मावअ २०२४/प्र.क्र. ५०(५)(अ)/तां.क.१ दि.०६/०८/२०२४ व मा. शासन निर्णय क्र. मावअ २०२४/प्र.क्र.५०(५)(ब)/ तां.क.१ दि.०६/०८/२०२४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार उक्त कामगिरी करुन घेणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे असे....

अ) माझी वसुंधरा अभियान २.० अंतर्गत करावयाची कामगिरी (एकूण ३७७५० रोपे)

अ.क्र.	कामाचे स्वरुप	र.रु.
१	मनपा स्थल सिमेत देशी प्रजातीची ८ ते १० फुट उंचीची रोपे लागवड करुन २ वर्ष विनामुल्य मेनटेन्स ठेवणे	१,०८,९३,२२५-००
२	मनपा स्थल सिमेत हरितक्षेत्रे देशी प्रजातीची ८ ते १० फुट उंचीचे रोपे लावुन हरितक्षेत्रे विकसित करणे व २ वर्ष विनामुल्य मेनटेन्स ठेवणे.	१,५८,३३,७६५-४१
३	बंदीस्त हरितक्षेत्रे विकसित करणे.	६७,६६,९५५-६२
४	महानगरपालिका स्थलसिमेत मियावॉकी गार्डन तयार करणे, बोन्साँय गार्डन विकसित करणे.	३२,४५,२२६-६४
५	नर्सरी विकसित करणे.	२०,७७,४२५-७३
६.	बाबू रोपांची लागवड करणे.	२०,२७,९९०-२३
७.	आमराई उद्यान नर्सरी विकसीत करणे	३,२५,०५७-८५
	एकूण	**४,११,६९,६४६-४९**

ब) माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत करावयाची कामगिरी (एकूण ५२०० रोपे)

क्र.	कामाचे स्वरुप	र.रु.
१	मनपा स्थल सिमेत देशी प्रजातीची ८ ते १० फुट उंचीची रोपे लागवड करुन २ वर्ष विनामुल्य मेनटेन्स ठेवणे	२२,४४,६२५-००
२	मनपा स्थल सिमेत हरितक्षेत्रे देशी प्रजातीची ८ ते १० फुट उंचीचे रोपे लावुन हरितक्षेत्रे विकसित करणे व २ वर्ष विनामुल्य मेनटेन्स ठेवणे.	३६,९७,५३३-०२
३	बंदीस्त हरितक्षेत्रे विकसित करणे.	२१,८६,७९४-४६
४	महानगरपालिका स्थलसिमेत मियावॉकी गार्डन तयार करणे, बोन्साँय गार्डन विकसित करणे.	१२,४२,८५३-१४
५	नर्सरी विकसित करणे.	७,५५,५५३-०७
६	बाबू रोपांची लागवड करणे.	२२,४१,०३४-७८
	एकूण	**१,२३,६८,३९३-४६**

उपरोक्त नमूद कामगिरीच्या अनुषंगाने सन २०२४-२५ सालातील माझी वसुंधरा अभियान ४.० उपक्रमां अंतर्गत स्पर्धेमध्ये गुणांकन आधारीत आहे. तसेच मनपा स्थल सिमेत ३३% हरितक्षेत्रामध्ये त्याचा उपयोग होणार आहे. यास्तव उक्त कामगिरीस मा.शहर अभियंता यांची र.रु.४,११,६९,६४६/- व र.रु.१,२३,६८,३९३/- मात्रच्या कामगिरीकरीता तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली असून, उक्त कामगिरी करीता सर्वकरासहित एकूण र.रु.५,३५,३८,०४०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

महापालिका स्थल सिमेमध्ये माझी वसुंधरा अभियान अंतर्गत उपरोक्त नमूद कामगिरीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा कलम २ (१) अन्वये रितसर ई महानिविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अदांजे र.रु.५,३५,३८,०४०/- मात्रच्या खर्चास तसेच स्थानिक स्तरांवर, जिल्हास्तरीय व राज्य स्तरांवर अशा तीन मराठी दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देणेस व जाहिरात प्रसिध्दीच्या खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्तकामी येणारा खर्च सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकातील E-१३०५) माझी वसुंधरा अभियान या लेखाशिर्षकामधुन होणेचा आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्र. मुख्य उद्यान अधिक्षक

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका